**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**चौथा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई -४०० ०३२.**

**दूरध्वनी क्र ०२२-२२७९४१९६** **Email ID :ud13-urban@mah.gov.in**

---

**टिपीएस-२०२५/VIP-४५/प्र.क्र.१३४/नवि-१३** **दिनांक :-०१.०७.२०२५**

**प्रति,**

संचालक,
नगर रचना महाराष्ट्र राज्य पुणे .

**विषय: विकास योजना - आटपाडी नगरपंचायत, जि. सांगली.**
आटपाडी नगरपंचायतीच्या प्रारुप विकास आराखड्यास स्थगिती देणेबाबत..

**संदर्भ:** मा.श्री.सुहास अनिलभाऊ बाबर, विधानसभा सदस्य यांचे मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांना दि.०६.०७.२०२५

**महोदय,**

विषयांकित प्रकरणी मा.श्री.सुहास अनिलभाऊ बाबर, विधानसभा सदस्य यांनी दि.०६.०७.२०२५ रोजीच्या निवेदनाद्वारे आटपाडी नगरपंचायतीची निवडणूकही झालेली नाही. नगरपंचायतीवर प्रशासक आहेत. आटपाडी शहराचा प्रारुप विकास आराखडा नुकताच जाहीर केलेला आहे. विकास आराखडयातील आरक्षण, रस्ता, रिंगरोड याबाबत नागरिकांना काही माहिती नाही. तसेच हरकती, तक्रारी कशा पध्दतीने करावयाच्या याबाबत कोणतीही माहिती नाही. त्यामुळे नागरिकामध्ये संभ्रमाचे, भितीचे व संतापाचे वातावरण निर्माण झालेले आहे. तरी आटपाडी नगरपंचायतीच्या प्रारुप विकास आराखडयास स्थगिती द्यावी अशी विनंती मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांना उक्त निवेदनाद्वारे केली आहे. (प्रत संलग्न)

मा. विधानसभा सदस्य यांचे दि.०६.०७.२०२५ रोजीच्या निवेदनामधील सर्व मुद्दे व उक्त प्रारुप विकास आराखडयामध्ये मधील प्रस्तावित आरक्षणे, विकास योजना रस्ते इत्यादी बाबत स्थानिक नागरीकांकडुन प्राप्त झालेल्या सर्व हरकती/सुचना तसेच इतर स्थानिक लोकप्रतिनिधीची निवेदने/प्रस्ताव विचारात घेऊन व याबाबत मुख्याधिकारी, आटपाडी नगरपंचायत, आटपाडी यांचेशी देखील सल्लामसलत

करुन सदर प्रारुप आराखडयाच्या अनुसरुन उक्त विकास योजनेच्या अनुषंगाने परिपुर्ण व वस्तुनिष्ठ असा अहवाल शासनास सादर करण्यात यावा.

सबब मा.लोकप्रतिनिधींच्या उक्त विनंतीस अनुसरुन आटपाडी नगरपंचायतीच्या प्रारुप विकास आराखड्याबाबत पुढील कार्यवाही तात्पुरत्या स्वरुपात थांबविण्यात यावी.

आपला,

(प्रणव कर्पे)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत माहितीसाठी :**

१. मा.श्री.सुहास अनिलभाऊ बाबर, विधानसभा सदस्य विटा,ता.खानापूर जिल्हा सांगली पिन-४१५ ३११.

**प्रत माहिती व तात्काळ उचित कार्यवाहीसाठी :**

१. सहसंचालक ,नगर रचना पुणे विभाग पुणे.
२. सहायक संचालक,नगर रचना सांगली शाखा कार्यालय सांगली.
३. मुख्याधिकारी, आटपाडी नगरपंचायत आटपाडी, जि.सांगली.

महाराष्ट्र विधानसभा

# सुहास अनिलभाऊ बाबर

विधानसभा सदस्य
विटा - 415 311
ता. खानापूर, जि. सांगली
मोबा. 9923064999, 9130117755

ACS (UD-I) दि. ०६/०७/२०२५

तपासून अ. वाढ़ा कार्यवाही करावी.

प्रति,
मा. ना. श्री. एकनाथजी शिंदेसाहेब,
उपमुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**विषयः- आटपाडी नगरपंचायतीचा प्रारुप विकास आराखडयास स्थगिती देणेबाबत**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये, माझे मतदारसंघातील आटपाडी नगरपंचायत (जि. सांगली) ही ३ वर्षापूर्वी स्थापन झालेली आहे. आटपाडी नगरपंचायतीची निवडणूकही झालेली नाही. नगरपंचायतीवर प्रशासक आहेत. आटपाडी शहराचा प्रारुप विकास आराखडा नुकताच जाहीर केलेला आहे. विकास आराखडयातील आरक्षण, रस्ता, रिंगरोड याबाबत नागरिकांना काही माहिती नाही. तसेच हरकती, तक्रारी कशा पध्दतीने करावयाच्या याबाबत कोणतीही माहिती नाही. त्यामुळे नागरिकामध्ये संभ्रमाचे, भितीचे व संतापाचे वातावरण निर्माण झालेली आहे.

**तरी आटपाडी नगरपंचायतीचा प्रारुप विकास आराखडयास आपणांकडून स्थगिती द्यावी, ही विनंती.**

आपला,

(सुहास अनिलभाऊ बाबर)